# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५११७७/१० ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-अभिलेख धारिका क्र. ४९/आरक्षण लागु करणे बाबत/1090/सन २०१८ दिनांक 03/११/२०१८.

वाचले :-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी (१).

२. महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७३ बी.

३. महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७३ सी.

४. महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ (५).

५. या प्राधिकरणाकडील प्रस्ताव जा.क्र. १२३४/सन २०१८, दिनांक २०/२/२०१८ .

६. विधी व न्याय विभागाकडील पत्र जा.क्र. १५५/७६३/सिव्हील/ कॉन्फिडेन्शल/२०१८/अे ब्रँच, दिनांक १०/९/२०१८.

७. कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडील पत्र जा.क्र. सनिनि १०१८/प्र.क्र. २४/१३-स, दिनांक ४/१०/२०१८.

**प्रस्तावना:-**

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी(१) मधील तरतुदीनुसार राज्यातील प्रत्येक सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाची, पदाधिकाऱ्याची व संस्थेत नैमित्तिकपणे रिक्त होणारी पदे विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार भरण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपविलेली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ बी मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थेच्या समितीवर अ.जा/अ.ज.; इतर मागास प्रवर्ग व वि.जा./भ.ज./वि.मा.प्र या प्रवर्गातील प्रत्येकी १ अशा तीन जागा राखीव असणे अनिवार्य असून सदर जागा संबंधीत प्रवर्गातील पात्र सभासदांमधुन निवडणे अनिवार्य आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सी मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थेच्या समितीवर महिला प्रवर्गातील दोन जागा राखीव असणे अनिवार्य असून सदर जागा पात्र महिला सभासदांमधुन निवडणे अनिवार्य आहे ;

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ बी, कलम ७३ सी व उपवीधीतील तरतुदींमुळे अशा जागांसाठी निवडणूक घेणे आवश्यक ठरते, मात्र संस्थेत आरक्षण प्रवर्गातील सभासद नसल्यामुळे सदरच्या जागा रिक्त राहतात व परिणामतः रिक्त राहणारी आरक्षणाची पदे ही गणेसंख्येसाठी धरण्यात येतात व त्यामुळे अनेक वेळा गणसंख्या पुर्ण न झाल्याने निवडणूक होऊनही प्रशासक नियुक्तीची कार्यवाही करणे क्रमप्राप्त ठरते ;

ज्या अर्थी मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक १३५४/२०१३ मधील निर्णयात असे नमुद केले आहे की, *"The second proviso to Article २४३ J (१) does not require that even if the cooperative society of individuals as members does not have any member from the category of the Scheduled Castes or the Schedule Tribes, the societies must still have on its Board of Directors one Director from the Schedule Caste/Schedule Tribes. So, also if the cooperative society of individuals as members does not have women members, the second proviso does not require*

Scanned by CamScanner

*that two seats on the Board of Directors of that cooperative society shall be reserved for women." ;*

ज्या अर्थी हया पार्श्वभूमीवर विधी व न्याय विभागाने यासंदर्भात दिलेल्या अभिप्रायांमध्ये स्पष्ट केले आहे की, *"This makes it clear that where the cooperative societies have members from the category of SC or ST or women, then in such cases it is mandatory for the societies to reserve the seat for S.C./S.T./women category as provided by the Legislature of the State. Thus, it can be said that, if no members from these categories are available in any society, then the provisions of the reservation of seats of committee provided under the State Legislature are not applicable in case of such society. However, as and when the members from these categories are available to the society, it becomes mandatory for such society to keep reserve the seats of committee for the members belonging to these classes/categories.";*

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (v) मधील तरतुदीनुसार संस्थेची निवडणूक प्रक्रिया भयमुक्त व मोकळया वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियमांशी सुसंगत आदेश/निर्देश देण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत. ;

त्याअर्थी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण सहकारी संस्थांच्या समिती निवडणूकीसाठी आरक्षण संदर्भात खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**:: आदेश ::**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीबी व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (v) अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

१. सहकारी संस्थेत अधिनियमाचे कलम ७३ बी व कलम ७३ सी या राखीव प्रवर्गातील सभासद उपलब्ध नसल्यास अशा संस्थांच्या समितीच्या निवडणूकीत असे आरक्षण लागु होणार नाही. तसेच सदरच्या राखीव प्रवर्गातील जागा हया समिती गठीत करण्यासाठी व गणसंख्ये करीता विचारात घेण्याची आवश्यकता राहत नाही.

२. तथापि, भविष्यात राखीव प्रवर्गातील व्यक्ती संस्थेत उपलब्ध झाल्यास समितीत आरक्षण लागु होऊन सदरची जागा संबंधीत प्रवर्गातील व्यक्तींमधुन नामनिर्देशनाने भरता येईल. सदरची जागा नामनिर्देशनाने भरल्यानंतरच गणसंख्येकरीता विचारात घेण्यात यावी.

सदरचे आदेश आपल्या अधिनस्त सहकारी संस्थांच्या निदर्शनास आणून सदर आदेशाचे काटेकोर पालन करण्याची दक्षता घ्यावी.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशाने.**

**(यशवंत गिरी)**
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

Scanned by CamScanner